# पत्र

सौ. भारती पवार
कनिष्ठ अभियंता (नि.)
जल विद्युत मंडळ, पुणे



**भातुकलीची बोळकी मिळाली
परवा कपाट आवरताना
माझी किती धांदल उडाली
गेल्या काळामागे धावताना**

चंद्रशेखर गोखले यांच्या या चार ओळी. पण आपण सर्वांनी याचा अनुभव घेतलाय. घर आवरताना बऱ्याच जुन्या गोष्टी मिळतात व त्या बरोबर त्याच्या आठवणी. पण मग वेळ कसा जातो ते कळतही नाही. अशीच एक गोष्ट आहे जिच्यासोबत आपण बऱ्याच आठवणी साठवतो व ती म्हणजे पत्र. अशा या पत्रांवर किंवा लिखाणावर मी काही सांगणार आहे.

पूर्वीच्या काळी आतासारखे फोन किंवा मोबाईल नव्हते, त्यावेळी संवादाचे एकच साधन होते ते म्हणजे पत्र. या पत्रांव्दारे एकमेकांशी बोलणं व्हायचं, विचारांची देवाणघेवाण होत असे. या पत्रांचे प्रकार म्हणजे कार्ड, अंतर्देशीय, पाकीट किंवा तार. यातले कार्ड व तार बहुतेक करून दु:खद समाचारांबद्दल असायचे. कार्ड किंवा तार आली म्हणाले कि, छातीत धस्स व्हायचे. यानंतर खुप काही पत्रांव्दारे कळवायचे असेल, चर्चा करायची असेल तर त्यासाठी अंतर्देशीय पत्रे किंवा पाकीट यांचा वापर व्हायचा.

या पत्रांचा मी स्वत: खूप वापर केलाय. माझी मुलगी सैनिकी निवासी शाळेत होती, इयत्ता ५ वी ते १० वी या काळात एवढे फोन नव्हते. अगदी तीन आठवड्यातून एखादा फोन, तो पण ट्रंक कॉल. मग आम्ही दोघी आठवड्यातून दोन पत्रे एकमेकींना पाठवायचो. त्यात मी इथे ती नसताना ज्या काही गोष्टी घडतील चांगल्या-वाईट त्या सविस्तर लिहित असे, तर ती तिच्या शाळेतील प्रत्येक बारीक सारीक गोष्ट लिहीत असे. त्यामुळे ती जेव्हा घरी यायची व सर्वांना भेटायची तेव्हा तिला सर्व काही माहिती असायचे. तिला आपण दूर आहोत याची जाणीव पत्रांमुळे होत नव्हती व मलाही ती दूर आहे याची जाणीव होत नसे. ती आठ वर्षे बाहेर शाळेत होती. या आठ वर्षात आमचेकडे जवळजवळ चारशे ते साडे चारशे पत्रांचा खजिना आहे. दोघींना तो जपलाय. अर्थात हे काही नविन नाही. अगदी इतिहासामध्ये सुध्दा याचे पुरावे आहेत.

आपले पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी आपल्या मुलीला इंदिरा गांधीना लिहिलेली पत्रे प्रसिध्दच आहेत. पंडित नेहरु स्वत: कामात व्यग्र असल्याने त्यांना आपल्या मुलीसाठी वेळ देता येत नाही याची खंत वाटत असे. पण मग यावर उपाय म्हणून त्यांनी आपला कारागृहामधला सर्व वेळ मुलीला पत्रे लिहिण्यात घालवला, त्यातून ते स्वत:चे अनुभव, तिच्यावर जे संस्कार करायचे ते संस्कार यातूनच घडले. या पत्रातूनच इंदिरा गांधी यांचे जीवन घडत गेले. असा संदर्भ यशवंतराव चव्हाण यांचे बाबतीतही देता येईल. यशवंतराव चव्हाण सतत दौऱ्यावर असायचे, त्यावेळी त्यांच्या पत्नी वेणूताईंना घरात एकटेपणाची जाणीव होत असे, हे जेव्हा यशवंतरावांना समजले तेव्हा त्यांनी एक नियम केला. दौऱ्यावर असताना रोज रात्री झोपण्यापूर्वी ते पत्नीला पत्र लिहीत, अगदी न चुकता. अशा पत्रांचा गठ्ठा ते दौऱ्यावरुन आल्यानंतर ते वेणूताईंकडे सुपूर्द करीत व दुसऱ्या दौऱ्यावर जात. त्यावेळी वेणूताई या पत्रांसोबत आपला वेळ घालवीत. आणीबाणीच्या काळात मधू दंडवते व प्रमिला दंडवते हे दोघे वेगवेगळ्या तुरुंगात होते तेव्हा ते सुध्दा पत्राव्दारे विचारांची देवाणघेवाण करीत. इंदिरा गांधी सुध्दा आपल्या मुला बरोबर संजय गांधी बरोबर पत्रातून वाढदिवसांच्या शुभेच्छा व संदेश देत. त्यांच्या पत्रातील चार ओळी तुमच्यासाठी देत आहे. "संजय, एक गोष्ट लक्षात ठेव, जे जे सामर्थ्यवान असतील, ते ते दुखावणारे असते. हे ही लक्षात ठेव की शत्रुशी दोन शब्द गोड बोलल्यामुळे काही बिघडत नाही. त्यातून काही निष्पन्न नाही झाले तरी आपल्याला काहीसे समाधान मिळते, ज्यामुळे आपण अधिक चांगले होऊ शकतो. कधी अगदी कधीसुध्दा क्षुद्रपणे वागू नकोस".

या पत्रांचा उल्लेख एका पत्राशिवाय करणे म्हणजे सर्व व्यर्थ. ते म्हणजे अब्राहम लिंकनचे पत्र. हे सर्वांनी वाचले असेलच. त्यात सुध्दा या अमेरिकन राष्ट्राध्यक्षांनी मुलांवर कशा प्रकारचे संस्कार होणे आवश्यक आहे हे सांगितले आहे व आजही त्याची गरज आहे. असेच एक पत्र एका पित्याने आपल्या मुलीला